दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक




● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३९० वा ● मंगळवार, ता. २६ ऑगस्ट २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

### कागज नहीं दिखाऐंगे; दिल्ली हायकोर्टाचा निर्णय

# मोदींची शिक्षण माहिती गुप्तच राहणार

**नवी दिल्ली । रयत समाचार**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पदवीच्या संबंधीची माहिती गुप्तच राहणार आहे. भारतीय जनतेला आता मोदी किती शिकले हे कधीच माहिती होणार नाही. दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी दिलेल्या निकालात म्हटले की, दिल्ली विद्यापीठाला (DU) मोदींच्या ग्रॅज्युएशन पदवीचे तपशील सार्वजनिक करण्यास भाग पाडता येणार नाहीत. केंद्रीय माहिती आयोगाने (CIC) २०१६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार, १९७८ मध्ये बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या नोंदी पाहण्याची परवानगी दिली होती. त्यावेळी नरेंद्र दामोदर मोदी यांनीही बी.ए. परीक्षा दिल्याचा उल्लेख केला गेला होता. मात्र दिल्ली विद्यापीठाने या आदेशाला आव्हान दिले होते.

जानेवारी २०१७ मध्ये पहिल्याच सुनावणीच्या दिवशी उच्च न्यायालयाने CIC च्या आदेशावर स्थगिती दिली होती. अखेर आता न्यायालयाने दिल्ली विद्यापीठाच्या बाजूने निर्णय देत केंद्रीय माहिती आयोगाचा आदेश रद्द केला आहे. मोदींच्या पदवीची माहिती आता देशातील जनतेला माहिती होणार नाही म्हणजे सार्वजनिक होणार नाही. दिल्ली हायकोर्टाने CIC चा आदेश केला रद्द. २०१६ पासून न्यायालयीन लढाई सुरू होती.




न्यायालयाने काय म्हटले? न्यायमूर्ती सचिन दत्ता यांनी CIC चा आदेश पूर्णतः रद्द करताना स्पष्ट केले की, ज्याचे लोकात रस आहे (interest of public) आणि जे लोकहिताचे आहे (public interest) यात फरक आहे. व्यक्तीची शैक्षणिक माहिती ही वैयक्तिक आहे आणि त्यात गोपनीयता आणि विश्वासाच्या आधारावर संरक्षित असणे आवश्यक आहे. न्यायालयाने दिल्ली युनिव्हर्सिटीचा हा आग्रह मान्य केला की, ते शैक्षणिक रेकॉर्ड न्यायालयास जागेवर दाखवायला तयार आहेत, पण परिचित नसलेल्या व्यक्तींबरोबर ती माहिती सार्वजनिक करण्यात येऊ नये, असेही त्यांनी याच वेळी स्पष्ट केले. मुख्यमंत्री अधिकारी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, दिल्ली युनिव्हर्सिटीच्या वतीने, म्हणाले की, माहिती अधिकार कायदा केवळ 'उत्सुकता भागवण्यासाठी' वापरला जाऊ नये, आणि विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठासाठी एका 'फिड्यूशियरी' (fiduciary)आधारावर संरक्षित असते, जिथे विश्वास आणि गोपनीयतेची जबाबदारी अस्तित्वात असते. मागील घटनाक्रम २०१५१६ मध्ये नीरज कुमार या आरटीआय कार्यकर्त्यांनी दिल्ली युनिव्हर्सिटीकडे १९७८ ची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नावे, रोल नंबर, मार्क्स यांची माहिती मागितली. CIC ने डिसेंबर २०१६ मध्ये विद्यापीठाला ही माहिती सार्वजनिक करण्यास सांगितले. परंतु, जानेवारी २०१७ मध्ये दिल्ली युनिव्हर्सिटीने या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आणि आदेशावर स्थगन आदेश (stay) मिळवला होता.

## कापूस आयात शुल्क हटविण्याचा निर्णय तात्काळ रद्द करा

**नवी दिल्ली । रयत समाचार**




संयुक्त किसान मोर्चाने (SKM) केंद्र सरकारच्या कापूस आयात शुल्क हटविण्याच्या निर्णयाविरोधात तीव्र भूमिका घेतली आहे. ता. १९ ऑगस्ट २०२५ रोजी वित्त मंत्रालयाने ११% आयात शुल्क आणि कृषी अधोसंरचना विकास उपकर (AIDC) हटविण्याची अधिसूचना काढली, जी ३० सप्टेंबरपर्यंत लागू राहणार आहे. मोर्चाचे म्हणणे आहे की, हा निर्णय शेतकरीविरोधी असून त्याचा थेट परिणाम देशातील ६० लाख कापूस उत्पादक कुटुंबांच्या उपजीविकेवर होईल. मोर्चाने सरकारकडे मागण्या मांडल्या आहेत की, कापूस आयात शुल्क हटविण्याची अधिसूचना तात्काळ मागे घ्यावी. कापूससाठी २+५०% प्रमाणे किमान हमीभाव (MSP) ₹१०,०७५ प्रति क्विंटल जाहीर करावा. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना ₹२५ लाखांचे नुकसानभरपाई पॅकेज द्यावे. कृषी आणि शेतकऱ्यांच्या हिताला धोका पोहोचविणारे कोणतेही मुक्त व्यापार करार (FTA) मान्य होऊ नयेत. मोर्चाने शेतकऱ्यांना गावोगावी सभा घेऊन MSP २+५०% समर्थनार्थ ठराव मंजूर करण्याचे आवाहन केले आहे. १, २ व ३ सप्टेंबर रोजी कापूस उत्पादक भागात ग्रामसभांचे आयोजन होईल. १० सप्टेंबरपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांना निवेदने देऊन स्वाक्षरी मोहिम राबविण्यात येईल. जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर मंडल महापंचायत व खासदारांविरोधात मोर्चे काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. मोर्चाचे प्रतिनिधीमंडळ १७-१८ सप्टेंबर २०२५ रोजी विदर्भ दौऱ्यावर जाणार असून कापूस शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर परिस्थितीचा आढावा घेईल. महाराष्ट्रात केवळ दोन महिन्यांतच (मार्च-एप्रिल २०२५) ४७९ शेतकरी आत्महत्या झाल्याची माहिती नुकतीच राज्य सरकारने दिली. मात्र पीडित कुटुंबांना केवळ ₹१ लाखाची मदत दिली जाते. संयुक्त किसान मोर्चाने केंद्र व राज्य सरकारकडे ही मदत वाढवून किमान ₹२५ लाख करण्याची मागणी केली आहे. मोर्चाने इशारा दिला आहे की, जर शेतकरी एकत्र आले नाहीत, तर केंद्र सरकार अमेरिकेच्या दबावाखाली अन्य पिकांसाठीही अशाच शेतकरीविरोधी धोरणांची अंमलबजावणी करू शकते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी एकदिलाने या निर्णयाचा निषेध करून तीव्र आंदोलन छेडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मराठा आणि ओबीसी आरक्षणावर राज्यात राजकीय वाद उफाळला

**नागपूर । प्रतिनिधी**




महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यात तीव्र राजकीय वाद उफाळला आहे. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आंदोलनाची धमकी दिल्यानंतर राजकीय वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले आहे. मराठा समाजाचे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटलांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मोठे आंदोलन आयोजित करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला की, जर सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागण्या दुर्लक्षित केल्या, तर मोठ्या प्रमाणावर आंदोलन करावे लागेल. त्यांनी असेही म्हटले की, मराठा समाजाच्या हक्कांसाठी हा संघर्ष अखेरपर्यंत सुरू राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनावर प्रतिक्रिया देत म्हटले की, सरकार मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत चर्चा करण्यास तयार आहे. त्यांनी समाजासाठी १०% आरक्षण तसेच उद्योजकांसाठी आर्थिक मदत यासारख्या उपाययोजना राबवल्या आहेत आणि जरांगे पाटलांना औपचारिक चर्चेसाठी आमंत्रित केले आहे. दरम्यान, ओबीसी समाजाच्या नेत्यांनी या आंदोलनाला विरोध दर्शविला आहे. माजी मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले की, मराठा समाजाला ओबीसी आरक्षण दिल्यास किंवा त्यांच्या हक्कांवर आघात झाल्यास, ओबीसी समाजही रस्त्यावर उतरू शकतो. त्यांनी सरकारला चेतावणी दिली की, या निर्णयामध्ये ओबीसी समाजाच्या हितांचा विचार करणे आवश्यक आहे. विरोधी पक्षांनीही या वादावर आपली भूमिका मांडली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी समाजाला आरक्षणाच्या हक्कांचे रक्षण करण्याचे आवाहन केले असून, आगामी निवडणुकांमध्ये ओबीसी समाज सजग राहावा, असे सांगितले आहे. या वादामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी समाजाला २७% आरक्षण मंजूर केले असून, मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागण्या आणि ओबीसी हक्क यामधील संतुलन राखणे हा सरकारसाठी आव्हानात्मक ठरले आहे. राज्यातील राजकीय पक्षांनी या मुद्द्यावर संवेदनशीलतेने विचार करून निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



## गोमंतक मराठी अकादमीचे अनुदान त्वरित सुरू करण्यासाठी ठराव

**पेडणे । रयत समाचार**

गोमंतक मराठी अकादमीच्या रविवारी झालेल्या आमसभेत सर्वानुमते ठराव घेतला गेला की, बंद केलेले अनुदान त्वरित सुरू करून समस्त गोमंतकीय मराठी भाषिकांना न्याय द्यावा. यावेळी अकादमीची वार्षिक निवडणूक पार पडली आणि नवीन सर्व सदस्य बिनविरोध निवडले गेले.

उपाध्यक्ष म्हणून नरेंद्र आजगावकर यांची फेरनिवड करण्यात आली. मराठी भवन सभागृहात पार पडलेल्या आमसभेत गेल्या वर्षभरात निधन झालेल्या सदस्यांना व मराठी कार्यकर्त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. अध्यक्ष प्रदीप घाडी आमोणकर यांनी प्रास्ताविक करून वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेतला, तर सचिव भारत बागकर यांनी इतिवृत्त व वार्षिक जमाखर्च वाचन करून मान्यता दिली. उपाध्यक्ष नरेंद्र आजगावकर यांनी अकादमीच्या कार्याची माहिती दिली.

ठराव मांडताना सदस्य महादेव गवंडी म्हणाले की, गोमंतक मराठी अकादमी ही गोव्यातील मराठी भाषिकांची शिखर संस्था आहे. दहा वर्षांपूर्वी सरकारने अनुदान बंद करून अकादमी आणि मराठी जनतेवर अन्याय केला आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत कोकणी अकादमीसह इतर संस्थांना मोठे अनुदान देतात, त्याप्रमाणे गोमंतक मराठी अकादमीसह सर्व मराठी संस्थांना विनाविलंब अनुदान सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली. मोरजी, मांद्रे व रेवोडा ग्रामपंचायतींनी मराठी ही गोव्याची राजभाषा व्हावी, अशी शिफारस केल्याबद्दल आमसभेत अभिनंदन करण्यात आले.

निवृत्त सदस्यांच्या जागी नवीन सदस्यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक अधिकारी प्रभाकर ढगे, सदस्य महादेव गवंडी व सुदेश कोचरेकर यांनी निवड प्रक्रियेचे मार्गदर्शन केले. निवडून आलेल्या सदस्यांमध्ये नवनाथ रामनाथ परुळेकर, श्यामसुंदर मनोहर कवठणकर, (अशोक) शांताराम गणेश घाडी, उदय वसंत ताम्हणकर, कौस्तुभ सोमनाथ नाईक, ध्रुव साबा कुडाळकर, निवृत्ती भिकाजी शिरोडकर, प्रकाश चंद्रकांत धुमाळ, डॉ. मधु सगुण गावडे घोडकीरेकर, राजेंद्र रघुवीर पेडणेकर, राजन न्हानू सावळ, सोमाकांत लक्ष्मण पिळणकर, नरेंद्र गुरुदास आजगांवकर, लाडकेश विष्णू पाळणी, संजय मंगेश नागडे, संजीव पुंडलिक नाईक व अवधूत रामचंद्र शिरोडकर यांचा समावेश आहे.

## सीएसआरडीमध्ये युवकांसाठी फ्लॅगशिप योजनांवर कार्यशाळा संपन्न



**नगर । रयत समाचार**

नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडिया यांच्या पुढाकाराने आयोजित सहाव्या राष्ट्रीय समाजकार्य सप्ताह २०२५ निमित्त बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था आणि भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत माय युवा भारत, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांसाठी फ्लॅगशिप योजनांवर कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेला प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा युवा अधिकारी सत्यजित संतोष, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, नाबकोर्न टीम लीडर विनोद मोटे, कृषी विज्ञान केंद्रातील पशुधन उत्पादन तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर गवळी आणि न्युट्रीकॅपच्या संचालक अपूर्वा तोरडमल उपस्थित होते. विद्यार्थी व संशोधकही मोठ्या संख्येने सहभागी झाले. जिल्हा युवा अधिकारी सत्यजित संतोष यांनी प्रास्ताविकात या कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी युवकांना केंद्र सरकारच्या विविध योजना समजावून दिल्या आणि योग्य दिशादर्शन मिळाल्यास युवकांचा सर्वांगीण विकास साधला जाऊ शकतो, असे सांगितले. विनोद मोटे यांनी स्टार्टअप इंडिया पोर्टलचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, या पोर्टलद्वारे उद्योग सुरू करण्यासाठी माहिती, आर्थिक सहाय्य तसेच आयपीआर व ट्रेडमार्क नोंदणीसाठी मदत मिळते. अटल इनोव्हेशन मिशनमुळे शाळा व महाविद्यालयांत इनोव्हेशन लॅब्स सुरू होत आहेत, ज्यामुळे भारत जगातील अग्रगण्य स्टार्टअप हब बनत आहे. डॉ. चंद्रशेखर गवळी यांनी राष्ट्रीय पशुधन अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले. देशी जनावरांचे संवर्धन, फोडर बँक योजना, तसेच शेतकऱ्यांसाठी उपलब्ध अनुदान व प्रशिक्षण या योजना रोजगारनिर्मिती आणि आर्थिक स्थैर्यासाठी उपयुक्त आहेत, असे त्यांनी अधोरेखित केले. अपूर्वा तोरडमल यांनी आपल्या प्रेरणादायी प्रवासाची माहिती दिली. कृषी अभियांत्रिकी पदवीधारक असूनही त्यांनी फ्लॅटमध्ये मशरूम शेती सुरू करून उत्पादने बाजारात उपलब्ध करून दिली. त्यांच्या कंपनीत महिला व युवक कार्यरत आहेत, ज्यामुळे युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरले. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. सुरेश पठारे यांनी सांगितले की, अशा कार्यशाळांमुळे युवकांना सरकारी फ्लॅगशिप योजनांची सखोल माहिती मिळाली, रोजगार, उद्योजकता व सामाजिक उद्योजकतेसाठी संधी उपलब्ध आहेत. डॉ. सुरेश मुगूटमल यांनी विद्यार्थ्यांनी समाजामध्ये या योजनांची माहिती प्रसारित करून जागृती निर्माण करावी, असे आवर्जून सांगितले.

## सुरेश खोपडे यांचा पोलिस कारवाई टाळून आंदोलन यशस्वी करण्याचा सल्ला

**मुंबई । रयत समाचार**



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लवकरच मुंबईत होणाऱ्या आंदोलनात जरांगे पाटील यांच्यासह सर्व आंदोलक नेत्यांना पोलीस कारवाई टाळून व्यावहारिक मार्गाने लढा देण्याचा सल्ला निवृत्त पोलिस अधिकारी सुरेश खोपडे यांनी दिला. २९ ऑगस्टला मुंबईत मोठ्या संख्येने मराठा बांधव जमणार असल्याची शक्यता असून, या पार्श्वभूमीवर खोपडे यांनी चार कुणबी मराठ्यांचा तगादा या नावाने आंदोलनाची रणनीती सुचवली आहे. मुंबईसह मोठ्या शहरात पोलीस ॲक्ट ३७ (१), (३) व सीआरपीसी कलम १४४ नुसार जमावबंदी लागू असते. त्यामुळे पाचपेक्षा जास्त लोक एकत्र आल्यास अटक होऊ शकते. अटक झाल्यास युवकांना नोकरी, पासपोर्ट व इतर अनेक बाबींमध्ये अडचणी निर्माण होतात. या परिस्थितीत, जरांगे पाटील यांनी शासनाशी चर्चेसाठी फक्त चार प्रतिनिधींसह आझाद मैदानावर बसावे, त्यांची नावे संबंधित पोलीस ठाण्यात द्यावीत, असा सल्ला खोपडे यांनी दिला आहे. हजारो आंदोलकांनी मात्र मैदानावर दूर उभे राहून केवळ 'बघे' म्हणून उपस्थित राहावे. पोलिसांनी विचारल्यास ''आम्ही फक्त ही गंमत पाहायला आलो आहोत'' असे सांगावे. भारतीय राज्यघटनेनुसार संचार स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे. गर्दीने उपद्रव केला नाही तर पोलिसांना थेट कारवाई करता येणार नाही. शासनाने दडपशाही केली तर जनमत आंदोलकांच्या बाजूने जाईल, असे खोपडे यांनी नमूद केले आहे. यासोबतच त्यांनी जरांगे पाटलांनी आरक्षणासोबतच बहुजन ऐक्य साधावे, माळी, धनगर, वंजारी तसेच अल्पसंख्याक जातींनी मराठा समाजासह एकत्र यावे, अशी शिफारसही केली आहे.

## मुंबईत संतसाहित्याचा जागर; शिक्षकांसमोर डॉ. पारनेरकरांचे प्रेरणादायी विचार

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

''आपुलाले चित्त शुद्ध करा..'' तुकोबांच्या या अभंगाचा दाखला देत संतसाहित्य अभ्यासक डॉ. रफिक सय्यद पारनेरकर यांनी मुंबईतील शिक्षकांना माणुसकीचे धडे दिले. दादर येथे झालेल्या भारतीय वीरांगणा'' या मुख्याध्यापिका श्रद्धा रोहोकले लिखित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




डॉ. पारनेरकर म्हणाले, समाज बदलवायचा असेल तर शिक्षक दर्जेदार असायला हवेत. अभ्यासक्रमामध्ये संतसाहित्य, समतेचे विचार, धार्मिक सहिष्णुता आणि मानवी मूल्यांचे संस्कार आवश्यक आहेत. डॉक्टर, इंजिनियर होण्यापूर्वी प्रत्येकाला आधी माणूस बनवणे महत्त्वाचे आहे. त्यांनी तुकोबांचे अभंग, ज्ञानेश्वरांचे पसायदान, सावित्रीबाई-फातिमाबाईंचा वारसा, राजर्षी शाहू महाराजांचे समतेचे कार्य, तसेच मुस्लिम वारकरी संतांचा उल्लेख करून शिक्षणात सद्भावना, जिव्हाळा आणि समतेची गरज अधोरेखित केली. ''विज्ञान आणि अध्यात्म ही एका गाडीची दोन चाकं आहेत. विज्ञानाचा दोष नाही, वापरणाऱ्यांचा दोष आहे. अण्वस्त्रं मानवतेसाठी वापरायची की विनाशासाठी? हे आपण ठरवायचं आहे.'' असे डॉ. पारनेरकर म्हणाले. यकार्यक्रमात पारनेरकर भूषण आणि आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले, तसेच डॉ. रफिक सय्यद पारनेरकर यांचा वारकरी भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. दरोडी गावचे सुपुत्र व मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी किसनराव पावडे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. शेकडो शिक्षक यावेळी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे, डीसीपी गणेश गावडे, लोकमत समूहाचे विजय झिमूर, सकाळ समूहाच्या अमृता देसरडा यांनीही आपले विचार मांडले. गीतांजली शेळके यांनी ''मनसंधारणातून जलसंधारण'' या अभिनव संकल्पनेवर मार्गदर्शन केले. लेखिका श्रद्धा रोहोकले यांनी जिजाऊ-सावित्री या नारीशक्तीचा उल्लेख करीत वाचनचळवळीची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती शेरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन भाऊसाहेब आहेर यांनी मानले. ''शिक्षणाच्या पदव्या मिळवत असताना माणुसकीचे धडे गिरवले तरच समाज उजळेल,'' असा मोलाचा संदेश या कार्यक्रमातून शिक्षकांना देण्यात आला.

# सुदृढ समाजनिर्मितीसाठी प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांची महत्वपूर्ण भूमिका– डॉ.पठारे

## सीएसआरडीमध्ये सहाव्या राष्ट्रीय समाजकार्य साप्ताहाचा समारोप

**अहमदनगर । रयत समाचार**

नॅशनल असोशिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडिया (नॅप्स्वी) पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या सहाव्या राष्ट्रीय समाजकार्य साप्ताहाचा समारोप बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर येथे आरोग्याचे सामाजिक निर्धारक व सामाजकार्याचा दृष्टीकोन या सेमिनारद्वारे पार पडला. आरोग्य क्षेत्रातील समाजकार्य, सेवा आणि सहानुभूती यांचा सेतू हि यावर्षाची मुख्य थीम असल्याने या सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इंडियन आर्मीचे ज्युनिअर कमिशन ऑफिसर्स मोहम्मद अली आणि राजेंद्र प्रसाद मिश्रा व सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे आदी मान्यवरांसह प्राध्यापक व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोहम्मद अली यांनी आपल्या मार्गदर्शनात जीवनातील सकारात्मकता, संघर्षांवर मात करण्याची वृत्ती आणि सामाजिक कार्याच्या मूल्यांची जाणीव करून दिली. त्यांच्या भावपूर्ण विचारांनी



विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास आणि उर्जा निर्माण केली. त्याचप्रमाणे, राजेंद्र प्रसाद मिश्रा यांनी जीवनातील आव्हाने स्वीकारण्याची तयारी, प्रामाणिक परिश्रम आणि सामाजिक योगदान यावर विशेष भर देत विद्यार्थ्यांना दिशा दाखवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील सामाजिक कार्यातील आपली भूमिका अधिक स्पष्टपणे समजली. सुरवातील विद्यार्थ्यांचे संशोधनात्मक पेपर प्रेझेंटेशन झाले. आरोग्य, कुटुंब रचना आणि सामाजिक जीवनाशी निगडीत विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास करून आपले विचार मांडले. बदलत्या कुटुंब रचनेमुळे पिढ्यानपिढ्यांतील नातेसंबंधांवर होणारे परिणाम, ग्रामीण व शहरी कुटुंब व्यवस्थेतील फरक, औद्योगिक कामगारांचे आरोग्य आणि त्याचा राष्ट्रीय प्रगतीशी संबंध, व्यावसायिक आरोग्यधोके व उपाययोजना, पुनर्वसन क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे महत्त्व, तसेच मानसिक आरोग्य संवर्धनात कुटुंबाची भूमिका अशा विविध पैलूंवर विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले. यामध्ये विशाल शिरसाठ, दुर्गा केदार, पायल बोबडे, शिवानी शिंगवी, सोनलकुमार डोळझाके, मानसी कोंडयाल, वैष्णवी दिवटे, राजरत्न शिंदे, अविनाश गभाळे, समीर गायकर, नयना पी, ओम घासे, अभिषेक वसटकर, प्रतिक्षा गायकवाड, भावना घोगले आणि विनायक बुधवंत या विद्यार्थ्यांनी प्रभावी प्रेझेंटेशन सादर केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. सुरेश पठारे यांनी समाजकार्याच्या क्षेत्रातील अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली आणि विद्यार्थ्यांनी पुढेही समाजहिताच्या दृष्टीने कार्यरत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांची सुदृढ समाजनिर्मितीसाठी महत्वपूर्ण भूमिका असून यासाठी सातत्याने पुढाकार घेणे गरजेचे आहे. या प्रसंगी डॉ. सुरेश मुगूटमल यांनी संपूर्ण आठवडाभरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी भगवाने यांनी केले तर आभार श्रावणी पांडे यांनी मानले, सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगूटमल, डॉ.जेमोन वर्गीस, डॉ.प्रदीप जारे, डॉ. विजय संसारे, आसावरी झपके, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, ट्विंकल ईश्वरी यांनी तसेच व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### महासायक्लोथॉनमध्ये हरदिन मॉर्निंग ग्रुपचा प्रभावी सहभाग

# जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते सदस्यांचा सन्मान



**नगर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजित महासायक्लोथॉन स्पर्धेत हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी प्रभावी आणि उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ही स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल ग्रुप सदस्यांचा सन्मान जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी तसेच पोलीस निरीक्षक उमेश परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ म्हणाले की, ''हरदिन मॉर्निंग ग्रुप हा केवळ सकाळच्या व्यायामापुरता मर्यादित नसून, आरोग्य व पर्यावरण संवर्धनाची चळवळ समाजात रुजविण्याचे काम सातत्याने करीत आहे.

विविध आरोग्य उपक्रमांमध्ये सहभागी होऊन नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला जात आहे.'' जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी ग्रुप सदस्यांचे अभिनंदन करताना आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उपक्रमात ग्रुपच्या सातत्यपूर्ण कार्याचे कौतुक केले. या महासायक्लोथॉनमध्ये ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्यासह रमेश वराडे, सचिन चोपडा, दिलीप ठोकळ, जहीर सय्यद, दीपक घाडगे, अविनाश जाधव, रतनशेठ मेहत्रे, मनोहर दरवडे, अशोकराव पराते, राजू कांबळे, दीपकराव घोडके, शंकरराव पंगुडवाले, दिनेश शहापूरकर, अनंत सदलापूर, दत्तात्रेय लाहुंडे, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ आदी सदस्यांनी सहभाग घेतला.



# भाग्योदय विद्यालयाचा कबड्डी संघ विजेता; तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा

**नगर । रयत समाचार**

नगर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये भोयरे पठार (ता. नगर) येथील भाग्योदय विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांच्या कबड्डी संघाने विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत नगर तालुक्यातील विविध शाळांच्या तब्बल ४० संघांनी सहभाग नोंदवला होता.

त्यामध्ये भाग्योदय विद्यालयाच्या मुलांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून विजय मिळवला. ही स्पर्धा भातोडी (ता. नगर) येथील राजमाता शिक्षण संस्था संचलित नृसिंह विद्यालयात पार पडली. यावेळी क्रीडा समितीचे अध्यक्ष महेंद्र हिंगे, संस्थेचे पदाधिकारी आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक उपस्थित होते. मुख्याध्यापक हबीब शेख यांनी सांगितले की, भाग्योदय

## गावाचे नाव उंचावले

विद्यालयाच्या कबड्डी संघाने मिळवलेले विजेतेपद हे शाळा आणि गावासाठी अभिमानाची बाब आहे. यशस्वी खेळाडूंचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

संघाच्या या यशाबद्दल भैरवनाथ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष भानुदासजी कोतकर, सचिव सचिन (आबा) कोतकर, संचालिका वैशालीताई कोतकर, रघुनाथजी लोंढे, मुख्याध्यापक हबीब शेख, क्रीडा शिक्षक भरत लगड यांच्यासह शालेय शिक्षक संजय गोसावी, सतीश मुसळे, शिवाजी धस, रामदास साबळे, सुनीता दिघे, अशोक टकले, मनीषा वाठोळे, संदीप भवर, अरुण उरमुडे आणि ग्रामस्थांनी विजेत्या खेळाडू व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.

### अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचा थरार

# फिरोदिया शिवाजीयन्स स्पर्धेला उत्साही प्रतिसाद

**नगर । रयत समाचार**

फिरोदिया शिवाजीयन्सच्या वतीने अहिल्यानगर शहरात आयोजित करण्यात आलेल्या इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धा २०२५ ला सोमवारी (दि. २५ ऑगस्ट) सुरुवात झाली. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचा थरार रंगला असून, यामध्ये तब्बल ४७ शालेय मुला-मुलींचे संघ सहभागी झाले आहेत. १५ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत शंभरपेक्षा अधिक सामने होणार असून, या स्पर्धेचे हे सातवे वर्ष आहे. या स्पर्धेचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते मैदानपूजन, आकाशात फुगे सोडणे आणि फुटबॉलला किक मारून करण्यात आले. यावेळी फिरोदिया शिवाजीयन्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव राजू पाटोळे, प्रदीप जाधव, उपाध्यक्ष खालिद सय्यद, राणासिंह परमार, जोगासिंह मिनहास, सहखजिनदार रणबीरसिंह परमार, विक्टर जोसेफ, अहमदनगर महाविद्यालयाचे क्रीडा



विभागप्रमुख डॉ. सॅवियो वेगास, कोअर कमिटी सदस्य जेव्हिअर स्वामी, राजेश अँथनी, सचिन पठारे, पल्लवी सैंदाणे, श्रेया सागडे, अभिषेक सोनवणे आदींसह प्रशिक्षक, पंच व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, ''शहरात फिरोदिया शिवाजीयन्सने फुटबॉल खेळ रुजवला असून, उत्कृष्ट खेळाडूंसह प्रशिक्षक व पंच घडविण्याचे काम केले आहे. फुटबॉल प्रशिक्षण व स्पर्धांद्वारे खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे. हारणे-जिंकणे हा स्पर्धेचा भाग असला तरी स्पर्धेतून स्वतःला सिद्ध करता येते,'' असे त्यांनी सांगितले. ज्ञानेश्वर खुरंगे यांनी उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या पाठबळामुळे शहरात फुटबॉलला चालना मिळाल्याचे सांगितले. ''सलग सात वर्षे या स्पर्धेद्वारे खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम होत असून, स्पर्धेचा अनुभव खेळाडूंना उपयुक्त ठरत आहे,'' असे त्यांनी नमूद केले. मनोज वाळवेकर यांनी शहरातील खेळाडूंनी विविध स्पर्धांमधून मिळवलेल्या यशामुळे गुणात्मक प्रगतीचा आलेख सर्वांसमोर असल्याचे सांगितले. स्पर्धेत शहरासह जिल्ह्यातील एकूण ४७ शालेय संघांचा सहभाग आहे. त्यामध्ये ९ मुलींचे संघ असून, १२, १४ व १६ वर्षे वयोगटातील मुलांबरोबरच १७ वर्षांखालील मुलींचे सामने खेळवले जाणार आहेत. स्पर्धा लीग पद्धतीने होणार असून, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिया तिवारी यांनी केले. उद्घाटन सत्रानंतर झालेल्या पहिल्या सामन्यांमध्ये प्रवरा पब्लिक स्कूलच्या मुला-मुलींनी दमदार कामगिरी केली. मुलींच्या १७ वर्षाखालील गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलचा ४-० असा पराभव केला. मुलांच्या १४ वर्षे वयोगटात प्रवरा पब्लिक स्कूलने पोदार इंटरनॅशनल स्कूलवर ६-० अशी मात केली. १२ वर्षे गटात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलवर ६-० असा विजय मिळवला. संध्याकाळी झालेल्या १६ वर्षे गटातील सामन्यात प्रवरा पब्लिक स्कूलने ऊर्जा गुरुकुलला २-० असे हरवत दिवसाची विजयी अखेर केली.

# डॉ. विखे अभियांत्रिकीचे प्रा. अनिरुद्ध शिर्के यांना पीएचडी

**अहमदनगर । रयत समाचार**



विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक अनिरुद्ध हरिश्चंद्र शिर्के यांना इंदूर येथील ओरिएंटल विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी 'Sustainable Development of Ternary Blended Concrete Using Nano Materials' या विषयावर सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेत संशोधन पूर्ण केले. त्यांच्या या संशोधनासाठी इंदूर येथील ओरिएंटल विद्यापीठाच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ. मनीष पाटकर यांचे मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यादरम्यान डॉ. शिर्के यांनी इंटरनॅशनल स्कोपस जर्नल्समध्ये ३ संशोधन पेपर्स सादर केले असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांचे एकूण १ संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत. डॉ. अनिरुद्ध शिर्के यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ. सुजय विखे आणि सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनीही त्यांचे कौतुक केले.

# डिजिटल मिडियाच्या नगर शहर उपाध्यक्षपदी एम.के. न्यूजचे महेश कांबळे

**अहमदनगर । रयत समाचार**



डिजिटल मीडिया संपादक, पत्रकार संघटनेच्या नगर शहर उपाध्यक्षपदी एम.के. न्यूजचे महेश कांबळे यांची निवड करण्यात आली. शहरातील हॉटेल व्ही स्टार येथे पार पडलेल्या कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी नवीन कार्यकारिणी जाहीर केली. यावेळी राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, समन्वयक इकबाल शेख, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रा. सुभाष चिंधे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नव्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते करण्यात आला. महेश कांबळे हे गेली २५ वर्षे पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी दा.पा. आपटे पत्रकारिता पुरस्कार, पुणे महानगरपालिका पुरस्कार, दै. सामना, दै. लोकसत्ता, संकेत अकॅडमी पुणे यांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. सध्या ते एम.के. न्यूज युट्यूब चॅनल चालवत असून, नगर मनपा वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य, जागतिक साळी फाऊंडेशन व बारा बलुतेदार संघटनाचे जिल्हा संपर्कप्रमुख, प्रतिबिंब संस्थाचे सचिव तसेच लक्ष्मीनारायण शाळेचे माजी सचिव अशा विविध सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रांत त्यांनी काम केले आहे. त्यांच्या लेखन व छायाचित्रणाची दखल मराठी, हिंदी आणि इंग्रजीतील अग्रणी दैनिकांनी घेतली आहे. त्यांनी नगरमध्ये आचार्य आनंदऋषी महानिर्वाण फोटो प्रदर्शन, फोटो क्लबचे प्रदर्शन यशस्वीपणे भरवले तर अवतार मेहेरबाबा व कोरठण खंडोबा या दोन माहितीपटांची निर्मितीही केली आहे. महेश कांबळे यांच्या निवडीबद्दल पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक










**हॉटेल भाड्याने देणे**

नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.

**- संपर्क -**
**९०११११३७००**

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# शहराची आरोग्य व्यवस्था कोलमडली; कचरा गाड्या बंद, सर्वत्र घाणीचे साम्राज्य

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

पावसाळ्याच्या दिवसातच श्रीरामपूर शहरातील आरोग्य व्यवस्था ढासळली आहे. नगरपालिकेच्या आरोग्य खात्याच्या दुर्लक्षामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. परिणामी रोगराईचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. पालिका प्रशासनाने शहरातील कचरा उचलण्याचे काम एका कंपनीकडे दिले होते. मात्र तिचा करार संपल्याने सध्या तात्पुरत्या स्वरूपात काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ठेकेदाराने कामात कुचराई सुरू केल्याची तक्रार नागरिक करत आहेत. कचरा उचलणाऱ्या घंटा गाड्या अनेक भागातून गायब झाल्या आहेत. काही भागांत दोन-दोन दिवस गाड्या फिरकत नाहीत. पूर्वी सकाळी सकाळी गाणी वाजवत येणाऱ्या गाड्या आता बंद पडल्या असून कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर होत आहे. नागरिकांच्या मते,



तक्रार सोशल मीडियावर मांडल्याशिवाय कचरा उचलला जात नाही. नियमित साफसफाई होत नाही. प्रत्येक वेळी नागरिकांनाच आरोग्य खात्याचे लक्ष वेधावे लागते. या स्थितीबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहरात रस्त्यांवर साचलेला कचरा वाऱ्याने उडून इतरत्र पसरतो. जनावरे त्यामध्ये तोंड घालून तो अधिक विखुरवतात. मोकाट कुत्र्यांचा व डुकरांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटना घडत असूनही पालिका नसबंदी किंवा बंदोबस्त करण्यात अपयशी ठरत आहे. डुकरांमुळे वाहतुकीलाही धोका निर्माण झाला आहे. पालिकेच्या आरोग्य खात्याकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ''स्वच्छतेचा ठेका नियमित करून कचरा वेळोवेळी व पूर्ण क्षमतेने उचलला जावा,'' अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच पावसाळ्यातील ढगाळ वातावरण, रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये साचलेले पाणी आणि वाढलेले डास यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**मुख्याधिकारी निष्प्रभ?**

**नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप हे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. सध्या प्रशासक राजवटीत सर्व विभागांचा कारभार त्यांच्याच अधिपत्याखाली आहे. मात्र त्यांच्या हाताखाली काम करणारे अधिकारी व कर्मचारी योग्य सहकार्य करत नसल्याने शहरातील आरोग्य व्यवस्था ढासळली आहे. पालिका निवडणुकीची तयारी, विभागांतील ताळमेळाचा अभाव आणि आरोग्य निरीक्षकांचा शहरातील पाहणीतील उदासीनपणा यामुळे समस्या तीव्र झाली आहे. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी आता कडक पावले उचलून शहरातील आरोग्य यंत्रणेला शिस्त लावावी, अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.**

औषध फवारणी तातडीने करावी, अशीही मागणी होत आहे.




## सरकारला सातबारा कोरा करण्याचा इशारा

# चिचोंडी पाटील येथे अनोख्या पद्धतीने बैलपोळा साजरा– सरपंच शरद पवार

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर चिचोंडी पाटील येथे पारंपरिक उत्साहात बैलपोळा साजरा करण्यात आला. मात्र यावेळी गावचे सरपंच शरद पवार यांनी या उत्सवाला वेगळाच सामाजिक व राजकीय संदेश जोडला. सरकारने निवडणूक काळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करत, सरपंच पवार यांनी ''सर्जा'' या बैलावर ''मराठा आरक्षण'' व ''सातबारा कोरा'' अशी घोषवाक्ये रेखाटून शेतकऱ्यांची व्यथा मांडली. निवडणुकीदरम्यान सर्व शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती करून सातबारा उतारा कोरा करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र सहा महिने उलटूनही शेतकऱ्यांचा सातबारा कोरा न झाल्याने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा अनोखा संदेश देण्यात आला. सरपंच पवार म्हणाले, ''बळीराजाच्या खांद्यावर शेताचा भार, संसाराचा भार आणि खोट्या आश्वासनांचा भार आहे. हा भार हलका करणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. सातबारा कोरा करून शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसा, अन्यथा जनता सरकारवर कोरा विश्वास ठेवणार नाही. सातबाऱ्यावरचे ओझे कमी करा, अन्यथा खोट्या आश्वासनांवर विश्वास ठेवू नये. सरकारने तातडीने सातबारा कोरा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा,'' अशी ठाम मागणी त्यांनी केली. या अनोख्या पद्धतीने साजऱ्या झालेल्या बैलपोळ्यामुळे शेतकरी प्रश्न पुन्हा एकदा अग्रस्थानी आले आहेत. यावेळी चिचोंडी पाटील येथील पदाधिकारी, पवार व पाटील परिवारातील सदस्य, ग्रामस्थ ढोल-ताशांच्या गजरात मंगलमय वातावरणात उपस्थित होते. बैलांच्या पारंपरिक सजावटीतून शेतकरी आपल्या बैलजोड्या घेऊन ग्रामपंचायत कार्यालय व मारुती मंदिर परिसरात दाखल झाले, त्यावेळी ग्रामस्थांनी उत्साहात त्यांचे स्वागत केले.

# ओंकार शुगर ग्रुपचा बिझनेस एक्सलन्स अवॉर्डने सन्मान



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

साखर उद्योगात अल्पावधीत भरारी घेणाऱ्या ओंकार शुगर ग्रुपला नवभारत समूहाचा 'बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड २०२५' जाहीर झाला आहे. मुंबईतील ताज हॉटेल येथे पार पडलेल्या सोहळ्यात परिवहन मंत्री प्रतापसिंह नाईक आणि मत्स्य व बंदर मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते ओंकार शुगर ग्रुपचे संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बाबुराव बोत्रेपाटील यांनी खडतर परिस्थितीवर मात करून उद्योगविश्वात प्रवेश केला. त्यानंतर साखर उद्योगाकडे लक्ष केंद्रित करून त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाची दखल विविध संस्थांकडून घेतली जात असून, ओंकार शुगर ग्रुपला यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. साखर उद्योगातल्या या यशस्वी वाटचालीबद्दल समाजातील सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# मनोज जरांगेंच्या स्वागताला शेवगावकर सज्ज

**शेवगाव । रयत समाचार**

मराठा आरक्षण आंदोलनाचे मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईकडे निघालेला मराठा ताफा २७ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वाजता शेवगावमध्ये दाखल होत आहे. त्यांच्या स्वागतासाठी शेवगाव तालुक्यातील सकल मराठा समाजाने मोठी तयारी केली असून तालुका एकप्रकारे उत्सवमय झाला आहे. जरांगे पाटील यांचे आगमन क्रांती चौक येथे होणार असून सकल मराठा समाजाच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. तालुक्यात प्रवेश करताच हजारो मराठा तरुण मोटारसायकल रॅलीसह त्यांना गौरवण्यात येणार आहे. कर्हे टाकळी, खानापूर, घोटण, तळणी, वडूले, सामनगाव, माळेगाव निंबे व नांदूर ढोरजळगाव या मार्गावरील गावांमध्येही स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. स्वागत रॅलीदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये यासाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शेवगाव तालुका डॉक्टर असोसिएशनने रुग्णवाहिका व आरोग्य सहाय्यक कक्ष उभारण्याची जबाबदारी घेतली आहे. वाहन पंचर किंवा बिघाड झाल्यास तालुक्यातील पंचर दुकानदार व फिटर मोफत सेवा देणार आहेत. याशिवाय जेसीबी चालक व मालकांनीही स्वागतासाठी सज्जता दाखवली आहे. मुंबईकडे जाणाऱ्या या दौऱ्यात शेवगाव तालुक्यातून शंभरहून अधिक वाहने ताफ्यात सहभागी होणार असून, संपूर्ण तालुका जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी सज्ज झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# चिचोंडी पाटील उपबाजाराच्या जागेची आमदार शिवाजी कर्डिले यांच्याकडून पाहणी

## जनावरांचा बाजार आणि कांदा मार्केट विचाराधीन



**नगर तालुका । रयत समाचार**

चिचोंडी पाटील येथील उपबाजाराचा भूमिपूजन समारंभ येत्या ३० ऑगस्ट रोजी होणार आहे. या कार्यक्रमाचे भूमिपूजन पं.स. मंत्री जयकुमार रावत यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील असतील. यानिमित्त उपबाजाराच्या जागेची पाहणी आणि कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसंदर्भात बैठक विवा मंगल कार्यालयात आमदार शिवाजी कर्डिले यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीस बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, मनीषा घोरपडे, रामदास सोनवणे, हरिभाऊ कर्डिले, संतोष म्हस्के, संजय गिरवले, सुधीर भापकर, दत्ता तापकीरे, भाऊ भोर, मधुकर मगर, राजू आंबेकर, सुभाष निमसे, धर्मनाथ आव्हाड, भाऊसाहेब ठोंबे, राजेंद्र बोथरा, नीलेश सातपुते, अशोक कोकाटे, विष्णू खांदवे, सुधीर भद्रे, सचिव अभय भिसे, बाळासाहेब लबडे, संदीप शिंदे, श्याम घोलप, बाबासाहेब काळे, बाजीराव हजारे, पांडुरंग ससे, रफिक मामू, तुकाराम दाताळ, अशोक चोभे आदी मान्यवर उपस्थित होते. आगामी उपबाजारात गाळे आणि जनावरांचा बाजार सुरू करण्यात येणार असून कांदा मार्केट सुरू करण्याचाही विचार आहे. मात्र यासाठी आणखी जागा उपलब्ध करून घ्यावी लागेल, असे प्रतिपादन आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी यावेळी केले. प्रास्ताविकात सचिव अभय भिसे यांनी उपबाजाराच्या आराखड्याची माहिती दिली. दरम्यान, परिसरातील नागरिकांतर्फे कांदा मार्केट सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने विष्णू खांदवे यांनी केली. सभापती भाऊसाहेब बोठे आणि उपसभापती रभाजी सुळ यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

# बापू मडके यांचे निधन

**शेवगाव । रयत समाचार**



तालुक्यातील सोनेसांगवी येथील बापू एकनाथ मडके वय ४५ यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, वडील, १ भाऊ, २ बहिण, दोन मुले, एक मुलगी, असा परिवार आहे. ऋषिकेश व राहुल मडके यांचे ते वडील तर राजाराम मडके यांचे ज्येष्ठ बंधू होत. त्यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# चव्हाण व कदमबांडे यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

प्रवरा स्पोर्ट अकॅडमी व अहिल्यानगर जिल्हा असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय मैदानी ॲथलेटिक्स अजिंक्यपद फेडरेशन स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे रोहन चव्हाण (१०० मीटर द्वितीय) व भाग्यश्री कदमबांडे (१०० मीटर प्रथम) यांची निवड झाली. दोघेही खेळाडू २ ते ५ सप्टेंबर २०२५ दरम्यान बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सहभागी होतील. यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल व कोच दया शितोळे यांच्या मार्गदर्शनाचा



लाभ मिळाला. सर्व यशस्वी खेळाडूंना महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी आ. बबनराव पाचपुते, सदस्य मा. बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आ. राहुल जगताप, मा. महावीर पाठवा, प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.



# थकीत ऊस बिलासाठी शेतकरी संघटनेचे रस्ता रोको आंदोलन

**शेवगाव । रयत समाचार**

केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याकडून २०२४-२५ च्या हंगामातील ऊस बिले न मिळाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. तब्बल आठ-नऊ महिने उलटून गेल्यावरही एकाही हप्त्याचा मोबदला न मिळाल्याने ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शेवगावच्या क्रांती चौकात स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे तीव्र रस्ता रोको आंदोलन होणार आहे. संघटनेच्या वतीने तहसीलदार कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. या प्रसंगी शेतकरी नेते दत्तात्रय फुंदे, कॉ. सुभाष पाटील लांडे, बाळासाहेब फटांगडे, मेजर अशोक भोसले, रावसाहेब लवांडे (कम्युनिस्ट पक्ष), प्रशांत भराट, मच्छिंद्र आरले, अमोल देवडे, नानासाहेब कातकडे, दादा पाचरणे, भागवत अंबादास, हरिभाऊ कबड्डी, मच्छिंद्र डाके आदी उपस्थित होते. संघटनेने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गाळप संपूनही बँकांचे हप्ते, खत-बियाण्यांचा खर्च, शालेय शुल्क आदी गरजांसाठी शेतकरी विवंचनेत आहेत. कारखान्याने वारंवार आश्वासने देऊनही ऊस बिले दिली नाहीत. साखर, भुसा, मळी, बगास यांची विक्री होऊनही पैसे शेतकऱ्यांपर्यंत न पोहोचल्याचा आरोप संघटनेने केला. या परिस्थितीसाठी कारखान्याचे व्यवस्थापन व संचालक मंडळ जबाबदार असून, शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या आंदोलनात शेवगावसह आसपासच्या तालुक्यांतील शेकडो शेतकरी सहभागी होणार असून, वाहतुकीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कोल्हार राज्यातील सर्वाधिक कृष्ण'वड' असलेले पहिले गाव म्हणून ओळखले जाणार– शिवाजी पालवे

## जय हिंद फाउंडेशनच्या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पाथर्डी । रयत समाचार**

पाथर्डी (अहमदनगर) जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने दुर्मिळ प्रजातीच्या कृष्णवडाच्या झाडांची लागवड मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत कोल्हार (ता. पाथर्डी) येथील कोल्हुबाईचे बिरोबा मंदिर परिसर ते कोल्हुबाई माता गड परिसरात ५० कृष्णवडांची लागवड करण्यात आली. या मोहिमेत कृष्णवडाच्या फांद्या व रोपांची लागवड करून परिसर हरित करण्यात आला. उपक्रमादरम्यान महादेव पालवे गुरुजी, उपसरपंच गोरक्ष पालवे, किशोर पालवे, ईश्वर पालवे, नामदेव गिते, बबनराव पालवे, विष्णू गिते, अशोक पालवे, सुभाष



डमाळे, आकाश डमाळे, जय हिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, महादेव पालवे, भगवान जावळे, नवनाथ डमाळे, चंदू नेटके, रामराव नेटके, भाऊ पालवे, आप्पा गर्जे, चंदू पालवे, संजय पालवे, नामदेव गिते, गहिनीनाथ पालवे, ऋषीकेश डमाळे, प्रशांत पालवे, आकाश पालवे, स्वराज पालवे, एकनाथ पालवे आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी बोलताना शिवाजी पालवे म्हणाले की, ''कृष्णवड हे झाड अतिशय दुर्मिळ असून वृक्षतोडीमुळे ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

कोल्हार येथे ५० कृष्णवड लावण्यात आल्याने कोल्हार हे राज्यातील सर्वाधिक कृष्णवड असलेले पहिले गाव ठरणार आहे. या झाडांमुळे शुद्ध ऑक्सिजन उपलब्ध होऊन ग्रामस्थांच्या आरोग्यास मोठा फायदा होणार आहे.'' कृष्णवडाच्या झाडाला धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व देखील आहे. भगवान श्रीकृष्ण यांनी लोणी खाण्यासाठी या झाडाची पाने वापरली होती. या पानांचा आकार द्रोणासारखा असल्यामुळेच याला 'कृष्णवड' हे नाव पडले. या वृक्षाची फळे पक्ष्यांच्या आहारासाठी उपयुक्त असून, हा वृक्ष पक्ष्यांना सुरक्षित निवारा देखील उपलब्ध करून देतो.

या उपक्रमाचे कोल्हार ग्रामपंचायत व कोल्हुबाई माता देवस्थान कमिटीच्या वतीने कौतुक करण्यात आले. तसेच ग्रामस्थांनी या झाडांची देखभाल करून गावाचे पर्यावरण हिरवेगार ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# भारत रशिया मैत्रीचा नवा अध्याय



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली आहे. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत चर्चा केली. आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची असल्याने या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. एस जयशंकर यांनी या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली या भेटीत अनेक विषयावर चर्चा झाली मात्र भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो.

भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. हे दोन देश पुन्हा एकत्र आले त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे हे मात्र नक्की.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# सुवर्ण महोत्सवी वर्षात बॅ. नाथ पै चौक गणेशोत्सव मंडळाचे विविध उपक्रम

**बेळगाव । रयत समाचार**



बेळगावच्या बॅरिस्टर नाथ पै चौक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यावर्षी सुवर्ण महोत्सव साजरा केला. मंडळाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये काशी विश्वनाथाचा भव्य देखावा "नमामी गंगे" या संदेशासह गणेश भक्तांसमोर सादर केला गेला. श्रीमूर्ती सुप्रसिद्ध मूर्तिकार एम.जी. पाटील यांनी तर काशी विश्वनाथ देखावा युवा कलाकार साहिल कोकितकर यांनी साकारला आहे.

१५ ऑगस्ट रोजी श्रीमूर्ती आगमन सोहळा मोठ्या धुमधडाक्यात पार पडला. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, कंकणवाडी आयुर्वेदिक महाविद्यालय व मंडळाच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर संपन्न झाले.

२७ ऑगस्टपासून आरती, पूजा व प्रसाद वाटपासह आठ दिवस विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित आहेत. यामध्ये पोलीस, हेस्कोम, पत्रकार, शिक्षक, लोकप्रतिनिधी व विविध जाती-धर्मातील ज्येष्ठ व्यक्तींना सन्मान, भजनकार्यक्रम, अथर्वशीर्ष पठण, मंगळागौर, व्यसनमुक्ती जनजागृती, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गरजू वृद्धांना ब्लँकेट वाटप यांचा समावेश आहे. जगन्नाथ पाटील यांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून त्यांनी आणि मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुवर्ण महोत्सवाच्या खर्चाची जबाबदारी स्वीकारली असून गणेशोत्सव भव्य व मंगलमय पार पडेल. यावर्षी संगीता स्वीट्स ५१ व्या वर्षात पदार्पण करत आहे. उपाध्यक्ष सचिन रंगरेज, माजी अध्यक्ष प्रदीप मजुकर, हिरालाल चव्हाण, सदानंद कदम, श्रीकांत काकतीकर व अन्य सदस्य उपस्थित होते.

# एनजीओ फेडरेशनकडून राज्यातील सामाजिक संस्था व ग्रंथालयांना डिजिटल नेटवर्क प्रोजेक्ट, तोही विनामूल्य निधीसह

**अहमदनगर । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य एनजीओ फ ेडरेशनच्या वतीने राज्यातील सर्व सामाजिक संस्था व सार्वजनिक वाचनालयांना एक ऐतिहासिक भेट मिळणार आहे. डिजिटल नेटवर्क प्रोजेक्ट हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सर्व संस्थांना एकही रुपया न घेता उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष दिपक आगळे यांनी दिली. राज्यात सुमारे ११ लाख सामाजिक संस्था कार्यरत असल्या तरी त्यांना आजवर शासकीय अनुदान किंवा सीएसआर फंडाशिवाय कुठल्याही प्रकारचे प्रकल्प मिळालेले नाहीत. छोट्या संस्थांना विशेषतः आर्थिक अडचणींमुळे हे फायदे पोहोचत नाहीत. ही तफावत दूर करण्यासाठी एनजीओ फ ेडरेशनने विनामूल्य डिजिटल नेटवर्क प्रोजेक्टचा निर्णय घेतला आहे. ७ सप्टेंबरला नेवासा फाटा येथे थेट संस्था व ग्रंथालय प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन डिजिटल नेटवर्किंग प्रकल्पाचे काम सुरू होणार आहे. यासाठी इच्छुक संस्थांनी आपली अधिकृत नोंदणी करून प्रकल्पात सहभागी व्हावे, असे आवाहन दिपक आगळे यांनी केले. "राज्यातील कोणत्याही संस्थेला एकही रुपया न घेता हा प्रकल्प देण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यात देखील अशाच विनामूल्य प्रकल्पांद्वारे संस्था सक्षम करण्याचे काम सुरू ठेवू. असे दिपक आगळे यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी ९८८११४१४८४ या क्रमांकावर संपर्क करावा.



**डिजिटल नेटवर्क प्रोजेक्टमुळे संस्था व ग्रंथालयांना मोठा आधार मिळणार आहे. दिपक आगळे पाटील यांनी खरोखरच अभूतपूर्व कार्य हाती घेतले आहे. सर्व संस्थांनी एकत्र येऊन हा उपक्रम यशस्वी करावा.**

**अण्णासाहेब बनसोडे**
प्रदेश उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य एनजीओ फेडरेशन.

# दीड लाख किंमतीचे १४ बोकड चोरीला; ग्रामस्थांची गस्तीची मागणी

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

हिवरगाव पावसा परिसरात मध्यरात्री संपत भीमाजी शिंदे यांच्या शेडमधून १४ बोकड चोरीची घटना घडली. पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून रात्री सुमारे ३ वाजता चोरटे शेडमध्ये घुसले. ग्रामपंचायतीने बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना रेकॉर्ड झाली आहे. या चोरीमुळे संपत शिंदे यांचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले. हिवरगाव पावसा टोल नाका परिसर संवेदनशील असून, मोटरसायकल, दुकाने व बोकड चोरीसह विविध चोरीच्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे रात्रीच्या गस्त पथकाची मागणी केली जात आहे. संपत भीमाजी शिंदे (५५) हे पशुपालक शेतकरी असून शेळी पालन हा त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य स्रोत आहे. शनिवारी पहाटे तीन वाजता अज्ञात चोरट्यांनी शेडचे कुलूप तोडून लहान-मोठ्या १४ बोकडांची चोरी केली. संपत शिंदे कुटुंबासमवेत झोपेत असताना शेळ्यांचा आवाज ऐकून शेडकडे गेले असता, पिकअप वाहन आणि १०१२ चोरटे फरार झाले. शेडमधून फरार झालेल्या बोकडांना पकडण्याचा प्रयत्न करताना संपत शिंदे यांना अडचण आली. चोरटे भरधाव पिकअप व मोटरसायकलवर पळून गेले. या घटनेत संपत शिंदे यांचे अंदाजे १.५ लाख रुपये नुकसान झाले. याबाबत त्यांनी घुलेवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले की, हिवरगाव पावसा व खांडगाव परिसरात अशा चोरीच्या घटना वाढत आहेत.





# राजाभाऊ गुडेकर सत्यशोधक बहुजन आघाडीच्या उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुखपदी

**नाशिक । रयत समाचार**

सत्यशोधक बहुजन आघाडी नाशिकच्या वतीने ता. २४ ऑगस्ट रोजी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेच्या आगामी उपक्रमांचा आढावा घेऊन पुढील काळात विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला. बैठकीत नांदगाव येथील शर्मा दांपत्य यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांचे विचार रुजवणे, महापुरुषांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य भेट देऊन त्या जयंत्या साजऱ्या करणे आदी उपक्रमांतून त्यांनी चळवळीत मोलाचे योगदान दिले आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे दिलीप बंद्रे, कॉ. ज्ञानेश्वर घाटुळ, कॉ. विलास कांबळे, भरत वाघमारे व आंबेडकरी चळवळीतील आदरणीय भदाणे सर यांच्या उपस्थितीत राजाभाऊ गुडेकर यांना उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुखपदी नियुक्त करण्यात आले. नांदगावातील चळवळीत सक्रिय कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध असलेल्या गुडेकर यांनी पदभार स्वीकारताना सत्यशोधक बहुजन आघाडी अधिक जोमाने कार्यरत ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीत उपस्थित मान्यवरांनी गुडेकर यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्याला अधिक वेग मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी अर्चनाताई पारचा, शितलताई आरणे, गणेश शर्मा, ताराबाई शर्मा, कैलास बकुरे, दादा बुखारी तसेच सत्यशोधक बहुजन आघाडी प्रसिद्धी प्रमुख सुनील सोपान पारवे उपस्थित होते. आभार प्रदर्शन कॉ. ज्ञानेश्वर घाटुळ यांनी केले.

# शंकर बोरूडे यांचे अपघाती निधन



**पाथर्डी । रयत समाचार**

भाजपचे शहराध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष बंडूशेठ बोरुडे यांचे बंधू शंकर रणजीत बोरुडे (४०)यांचे काल रात्री १२:३० च्या सुमारास कोरडगाव रोडवरील ढाकणे यांच्या सत्यभामा पेट्रोल पंपासमोर अपघाती निधन झाले. रात्री त्यांच्या मालकीचे जय मल्हार हॉटेल बंद करून घरी जात असताना स्विफ्ट गाडीने त्यांना जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की स्विफ्ट गाडीच्या एअर बॅग उघडल्या.या धडकेत त्यांचे जागीच निधन झाले. त्यांच्यावर पाथर्डी येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बोरुडे यांना श्रद्धांजली अर्पण केली.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुली,एक मुलगा,भाऊ,भाऊजाई असा परिवार आहे.





# अथर्व सुदामेंना पैगंबर शेख यांचे पत्र

प्रति,

**अथर्व सुदामे,**

खरेतर तुला बोलण्यासारखे खूप काही आहे माझ्याकडे. तुला धर्मांधांकडून ट्रोलिंगला सामोरे जावे लागले. कारण काय तर राज्य महोत्सव घोषित केल्या गेलेल्या गणेशोत्सवाची मूर्ती तू एका मुस्लिम मूर्तीकाराकडून खरेदी करताना तुझ्या एका व्हीडिओमध्ये दाखवले, म्हणून तू या ट्रोलिंगचा शिकार झाला. तुला झालेली ट्रोलिंग माझ्या एवढं कोण समजुन घेणार ? मी एक असा प्राणी आहे जो धर्मांध हिंदुत्ववादी आणि धर्मांध मुस्लिम दोन्हीकडून कायमच ट्रोल झालेलो आहे. पण या सगळ्यांना फाट्यावर मारून उभं रहायचं असतं. हाच काय तो पुणेरी बाणा. एवढा पुणेरी माज स्वत:मध्ये नसेल तर फायदा काय ? खरं पाहायला गेलं तर तुझ्या व्हीडिओमुळे कोणाच्या पोटात दुखण्याची काहीच गरज न्हवती. महाराष्ट्रात असे कित्येक मुस्लिम आहेत जे गणेश मूर्ती बनवतात, त्यांना रंग देण्याचे काम करतात, एवढंच काय मूर्तीचा साचा बनवण्यात देखील ते असतात. याच्या ढिगाने मुलाखती युट्युबवर पडलेल्या आहेत. ते ज्याने त्याने शोधून पाहावे. थोडी चिकित्सा करायला शिका. द्वेष पसरवण्यापेक्षा ते जास्त योग्य राहील. एकीकडे म्हणायचं मुस्लिम आमच्या धर्माचा आदर करत नाही. आणि आदर करताना एखादा रील दाखवला तरी यांच्या पोटात दुखते. यांच्या डोक्यात द्वेषाचा केमिकल लोचा झालेला आहे. यांनाच समजत नाही यांना काय करायचं आहे ते. जिथे आदर करताना दाखवले जाते तेही त्यांना नको असते. मग यांना नक्की हवे काय ? खोटा अपप्रचार करणारी आणि हिंदू मुस्लिम द्वेष वाढवणारे सिनेमे, नाटके, जाहिराती आणि भाषणे. यापलीकडे यांची मजल नाही. अथर्व, मित्रा तू अजमेरला जा तुला तिथे शेकडो हिंदू व्यापारी दिसतील. लांब कशाला पुण्यात राहतोस तर खेड शिवापूर दरगाहला जा तिथे हिंदू आणि मुस्लिम दोन्ही व्यावसायिक असलेले दिसतील. तिथे मुसलमान भाविक एका हिंदू व्यावसायिकाकडून चादर घेऊन दरगाहमधील मजारवर कसा टाकतो ते बघ आणि त्याचा रील अवश्य बनव. अजमेमध्ये जाऊन दरगाह बाहेर मिठाई, चादर विकणाऱ्या हिंदू व्यापाऱ्यांना पहा त्यांच्याकडून हजारो मुस्लिम खरेदी करताना त्यांना कधी धर्म विचारतात का ? हे पहा आणि जमले तर त्यावर अवश्य रील बनव. या धर्मांध लोकांना अजून सर्वसमावेशक भारत समजलेला नाही. यांच्या मानसिकतेला राजकीय वाळवी लागल्याने आता तो त्यांना समजून देखील घ्यायचा नाही. असो, पण या परिस्थितीत आमच्यासारखे लोक तुझ्यासोबत आहोत. बिनधास्त व्हीडिओ पुन्हा अपलोड कर. आणि देशातील सर्वसमावेशकता या सणाच्या निमित्ताने सर्वांना दाखवुन दे. मुस्लिमांनी देखील तो व्हीडिओ डिलीट करावा लागला म्हणून जास्त दुःखी होऊ नये. काही वर्षांपूर्वी एमआयएम आमदार वारीस पठाण एका गणपती मंडळात "गणपती बाप्पा मोरया" म्हणाले होते तर त्यांना धर्मांध मुस्लिमांनी किती ट्रोल केले होते याची जरा माहिती घ्या. वारीस पठाण यांना देखील त्यानंतर माफी मागावी लागली होती. वारीस पठाण मुस्लिम असले तरी एक लोकप्रतिनिधी आहेत हे त्यावेळी बरेच जण विसरले होते. लोकप्रतिनिधीला धर्म नसतो. तो ज्या धर्माच्या लोकांसोबत ज्या वेळी उभा असतो तोच त्याचा धर्म. पण हे न समजण्याबाबत धर्मांध मुस्लिम आणि धर्मांध हिंदुत्ववादी एकसारखेच आहेत. अशा घटनांमधून त्यांना आरसा दाखवणे जरा सोपे जाते. धर्मांध हिंदुत्ववादी आणि धर्मांध मुस्लिम याबद्दल आत्मपरीक्षण करतील ही अपेक्षा आहे. धमकी देणारा जयसिंग मोहन आणि आपल्याकडे नसलेल्या ज्ञानाचे आभाळ वाकवणारे आनंद दवे या दोन्हीकडे जास्त लक्ष देऊ नका. ही लोक कायम द्वेषभावात जगणारी आहेत. यांच्या आयुष्यात प्रेम नावाचा प्रकार नाहीये. त्यामुळे अशांना भीक घालू नका. सर्वसमावेशकतेची ही साखळी अशा लोकांमुळें तुटणार नाही. आपण ही साखळी आणखीन मजबूत करू. त्यासाठी माणसे जोडू. माणसं जोडली पाहिजे.

**- पैगंबर शेख**
(अट्टल पुणेकर)
संपर्क - ९९७००७०७०५